जाक्र.कोजिप/शिक्षण /माध्य/वशि१०/अति.समायोजन/१७
शिक्षण विभाग (माध्यमिक)जिल्हा परिषद,कोल्हापूर
दिनांक :-३/०४/२०१७

प्रति,
मा.अध्यक्ष/सचिव (सर्व संस्था)
प्राचार्य/मुख्याध्यापक
माध्यमिक विद्यालय सर्व
कोल्हापूर जिल्हा

**विषय :-अतिरिक्त शिक्षक समायोजनाबाबत सन २०१६-१७..**

संदर्भ :- मा.आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील परिपत्रक क्र/ईगव्ह/अतिरिक्त समायोजन/२०१६-१७/१८१६ दि.३१ मार्च २०१७

उपरोक्त विषयास अनुसरून आपणांस कळविणेत येते कि,सोबत जोडलेल्या संदर्भिय पत्राचे अवलोकन करावे.व पत्रातील पान क्र.१ व २ मधील मार्गदर्शक सुचना व पान क्र२ वरिल समायोजनाची प्रक्रिया खालील प्रमाणे राहील. मधील मुददा क्र.१ व २ यांचे संस्थानी अवलोकन करावे व पालन करावे.म्हणजे अतिरिक्त शिक्षक ठरविणे सोईचे होईल. व शिक्षण विभागाला अतिरिक्त शिक्षकांची माहिती अचुक देता येईल.तसेच संदर्भिय पत्रातील पान क्र.३ व ४ मधील माहितीचे अवलोकन करावे.व त्याचे संस्थानी अचुक पालन करावे.तसेच सोबतच्या पत्रातील शासन निर्देशानुसार ऑनलाईन समायोजनाचे पुढील प्रमाणे टप्पे राहतील या मुदयाची पान क्र.४,५व ६वर दिलेली माहिती समजुन घ्यावी.म्हणजे समायोजन प्रक्रियाबाबत आपणांस अवगत होईल.

तसेच सोबत दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे तात्काळ कार्यवाही करून,या कार्यालयाकडे वेळेत माहिती उपलब्ध करून देणेची जबाबदारी संस्था व शाळेचे मुख्याध्यापक यांची राहील.

**अनुदानित पदावरिल अतिरिक्त शिक्षकांच्या ऑनलाईन समायोजनाची प्रक्रिया पुर्ण करण्यासाठीचे वेळापत्रक सन २०१६-१७**

| अ.क्र | प्रक्रिया | दिनांक |
|---|---|---|
| १ | संस्थाअंतर्गत अतिरिक्त झालेल्या शिक्षकांचे समायोजन पूर्ण करणे व अतिरिक्त होणा-या शिक्षकांचे नावासह विहीत पध्दतीने प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर करणे.(संदर्भिय पत्राचे अवलोकन करावे.) तसेच अतिरिक्त होणा-या शिक्षकांना आपले स्तरावरून संस्थानी व शाळांनी लेखी कळविणे | ५/४/२०१७ ते १०/४/२०१७ |
| २ | संस्थेकडील अतिरिक्त शिक्षक,आरक्षण व विषय निहाय रिक्त पदे इ.बाबीसाठी शिक्षणाधिकारी यांनी मान्यता देणे.तसेच अतिरिक्त /रिक्त पदाबाबत कांही तक्रारी असल्यास संबधितानी निवेदने शिक्षणाधिकारी यांचेकडे सादर करणे. | १०/४/२०१७ ते २२/४/२०१७ |
| ३ | शिक्षणधिकारी व विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी प्राप्त निवेदनाचे निराकारण करून निर्णय देणे. | १७/४/२०१७ ते २६/४/२०१७ |
| ४ | संस्थानिहाय अतिरिक्त शिक्षक व आरक्षण व विषय निहाय रिक्त जागा यांची यादी प्रसिध्द करणे. | २९/४/२०१७ |
| ५ | संस्थानी/ शाळानी अतिरिक्त शिक्षक , आरक्षण व विषय निहाय रिक्त जागा यांची यादी प्रसिध्द करणे व अतिरिक्त शिक्षकास लेखी कळविणे. | २/५/२०१७ |
| ६ | अतिरिक्त शिक्षक ,आरक्षण व विषय निहाय रिक्त पदांची अंतिम सुची झाल्यावर शिक्षणाधिकारी यांचे लॉगिनवर शिक्षणाधिकारी यांनी माहिती भरणे. | २९/४/२०१७ ते ३/५/२०१७ |

| | | |
|---|---|---|
| ७ | शिक्षणाधिकारी यांनी जिल्हयाच्या अतिरिक्त शिक्षकांची सेवा जेष्ठता यादी संस्था निहाय आरक्षण विषय निहाय रिक्त पदांची माहिती प्रसिध्द करणे व संस्था लॉगिनला उपलब्ध करणे. | ४/५/२०१७ ते ६/५/२०१७ |
| ८ | जिल्हा स्तरावरील ऑनलाईल समायोजन प्रक्रिया टप्पा क्र.१ संस्था लॉगिनव्दारे संस्थेच्या पंसतीने निवड करणे. | ८/५/२०१७ ते १३/५/२०१७ |
| ९ | जिल्हा स्तरावर ऑनलाईन समायोजनाची प्रक्रिया टप्पा क्र.२(राऊंड १ ते ६) | १५/५/२०१७ ते २०/५/२०१७ |
| १० | अतिरिक्त शिक्षकांना समायोजित शाळेत रूजु होण्यासाठी जुन्या शाळेतुन कार्यमुक्त करणे,त्याचबरोबर त्यांची रिलीव्ह फॉर्ममध्ये शाळेच्या मुख्याध्यापकांनी ऑनलाईन नोंद करणे. | १६/५/२०१७ ते २०/५/२०१७ |
| ११ | अतिरिक्त शिक्षकांना समायोजित शाळेत रूजु करून घेणे, त्याचबरोबर जॉईनिग फॉर्ममध्ये शाळेच्या मुख्याध्यापकांनी ऑनलाईन नोंद करणे. | १७/५/२०१७ ते २५/५/२०१७ |

वरिल प्रमाणे सर्व कार्यपध्दतीचे काटेकोरपणे पालन होईल व दिलेल्या वेळापत्रकानुसार अतिरिक्त शिक्षकांच्या ऑनलाईन समायोजनाची प्रक्रिया पूर्ण होईल. यासाठी संबधित संस्थानी व मुख्याध्यापकांनी त्यांचे स्तरावर अतिरिक्त ठरणा-या शिक्षकांची माहिती व आरक्षण व विषयनिहाय रिक्त जागा यांची माहिती वेळापत्रकाप्रमाणे या कार्यालयास सादर करणेची जबाबदारी संबधिताची राहील याची नोंद घ्यावी .

**सर्व प्राचार्य/मुख्याध्यापक यांनी सदरचे पत्र व संदर्भिय पत्र संस्थेचे अध्यक्ष/सचिव यांचे निदर्शनास आणावे.**
**सोबत - वरिल संदर्भिय पत्र**

**शिक्षणाधिकारी(माध्यमिक)**
**जिल्हा परिषद कोल्हापूर.**

प्रत माहितीसाठी सविनय सादर,
१.मा.आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे
२.मा.शिक्षण उपसंचालक कोल्हापूर विभाग ,कोल्हापूर